Peer Reviewed Referred and UGC
Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II
IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

Modernization of Maharashtra In the 19th Century

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII  Issue - I  Marathi Part - II  January - March - 2019

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2018 - 5.5**
**www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | पंडित रमाबाई यांचे स्त्री सुधारणेविषयीचे विचार: विशेष संदर्भ : द हाय कास्ट हिंदू वूमन<br>**प्रा. मालती सानप** | ७२-७४ |
| १५ | १९व्या शतकातील महाराष्ट्रातील शेती उद्योग : बदल आणि परिणाम<br>**किरण गणपत कुंभार** | ७५-७७ |
| १६ | शिक्षणाचा सामाजिक विस्तार व बहुजनांच्या शिक्षणाचे प्रयोग एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. कुरुमकर रघुराज एम.** | ७८-८१ |
| १७ | ब्रिटीश वसाहतकालीन महाराष्ट्राच्या शिक्षणात एल्फिन्स्टन चे योगदान<br>**लक्ष्मण नथ्थुप्रसाद गोरे** | ८२-८६ |
| १८ | महाराष्ट्रातील दलित चळवळींची पार्श्वभूमी<br>**प्रा. डॉ. रामभाऊ रा. मुटकुळे**<br>**प्राचार्य डॉ. बबन पवार** | ८७-८९ |
| १९ | महाराष्ट्रातील कामगार चळवळींचा उदय<br>**कु. रेणुका प्रकाशराव हाक्के**<br>**प्रा. डॉ. शारदा कदम** | ९०-९३ |
| २० | वासाहतिक महाराष्ट्रातील धर्मसुधारणा विचार<br>**प्रा. अंबादास ओंकार बाकरे** | ९४-९८ |
| २१ | महाराष्ट्रातील शिक्षण आणि आधुनिकीकरण<br>**प्रा. महेश वसंत कुलकर्णी** | ९९-१०१ |
| २२ | महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा उदय व विकास<br>**प्रा. मतकर कविता भगिरथ** | १०२-१०५ |
| २३ | महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री उद्धाराचे कार्य<br>**प्रा. काकडे बी. जे.**<br>**प्रा. गंडाळ ए. टी.** | १०६-११० |
| २४ | आगरकरांचा व्यक्तीवाद<br>**प्रा. डॉ. अरूणा मोरे** | १११-११५ |
| २५ | पाश्चात्य शिक्षणाविरुद्ध राष्ट्रवादी शिक्षणाची चळवळ<br>**प्रा. डॉ. सय्यद मुजीब मुसा** | ११६-११८ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २२. महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा उदय व विकास

**प्रा. मतकर कविता भगिरथ**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

**प्रस्तावना**

जगातील कामगारांनो एक व्हा असे म्हणणा-या कार्ल मार्क्सने जगातील सगळ्या कामगारांना एकत्र येण्याचे आव्हान केले त्याचप्रमाणे 18 व्या शतकाच्या मध्यात सुरु झालेल्या औदयोगिक क्रांतिमुळे जागतिक स्तरावर झालेले बदल हे कामगार चळवळीशी अतिशय निगडित आहे असेच म्हणावे लागेल. 1921 ते 1929 हा काळ जागतिक महामंदिपूर्वीच्या काळ होतो. 1929 मध्ये सुरु झालेल्या जागतिक महामंदीची झळ सर्वच भांडवलशाही राष्ट्रांना आणि त्यांच्या ताब्यात असलेल्या वसाहतीना पोहोचली आणि त्यानंतर 3-4 वर्षे जागतिक बाजारपेठेत किमती झपाटयाने उतरु लागल्या. अनेक कारखाने बंद पडले. नोकरकपातीमुळे बेकारांच्या संख्येत भर पडली. कारखानदार नवे उदयोग उभारण्यास उत्सुक नव्हते. त्यामुळे नव्याने रोजगार उपलब्ध होणे शक्य नव्हते. त्यामुळे जे कारखानदार होते त्यांनी कमीत कमी मजुरीत जास्तीत जास्त मजुर घेण्यावर भर दिला आणि यातूनच पुढे श्रीमंत व गरीब दरी निर्माण होऊन त्यांच्यात वाद होण्यास सुरुवात झाली आणि यातुनच पुढ कामगारांच्या हक्कासाठी संघटनांची स्थापना झाली आणि या संघटनांनी कामगारांच्या प्रश्नांचा अभ्यास करुन ते प्रश्न सरकारपर्यत पोहोचविण्याचे कार्यकेले व हळूहळू सरकारने ते प्रश्न कमी करण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्राच्या इतिहासात कामगार चहवळीचे अतिशय महत्व आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय इतिहासात कष्टकरी वर्गाने किंवा मजूरांनी उभारलेल्या चळवळीचे महत्वाचे योगदान आहे. आपल्या हक्काचे किंवा व्यक्तीगत जीवनाच्या विकासासाठी या कष्टकरी वर्गाने उभारलेल्या संघटना देखील तेवढयाच महत्वाच्या मानण्यात येतात. आपली आर्थिक स्थिती किंवा आपले जीवन इतर नोकरदार वर्गा प्रमाणे व्हावे किंवा आपली परिस्थिती सुधारावी यासाठी कामगारांनी वेळोवेळी संघटीत होऊन केलेल्या प्रयत्नांतून कामगार चळवळी उदयास आल्या. या कामगार चळवळीमागील पार्श्वभूमी पाहिल्यास ब्रिटीशकालीन अन्याकारक परिस्थिती त्यास कारणीभूत ठरली असेच म्हणावे लागेल. महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा आढावा घेतल्यास कामगार चळवळीस सर्वात प्रथम प्रोत्साहन देण्याचे काम नारायण मेघाजी लोखंडे यांनी केले. व तेव्हा पासून कामगार संघटनांच्या स्थापनेस चालना मिळाली.

स्वत ची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता कामगारांनी वेळोवळी केलेले प्रयत्न या कामगार चळवळीच्या माध्यमातून आपल्या समोर आलेले दिसतात. एका बाजूला उत्पादन साधनाची मालकी नसलेले व मोलाने काम करण्याशिवास कोणतेही अन्य उपजीवीकेचे साधन नसलेले कामगार तर दुस-या बाजूला उत्पादन साधनांची मालकी असलेले आणि कामगारांची पिळवणूक करुन आपला नफा जास्तीत जास्त वाढविण्या-या ध्येयाने प्रेरित झालेले भांडवलदार, असे परस्परविरोधी हितसंबंधाचे दोन वर्ग समाजात एकत्र आल्यावर वाद निर्माण होणे हे साहजिकच आहे.

आधुनिक युगाच्या प्रारंभी झालेल्या सरंजामशाही आणि कुटिरोदयागाच्या -हासामुळे तसेच भांडवलशाहीच्या उदयामुळे ख-या अर्थाने कामगार वर्ग निर्माण झाला व भांडवलदारापासून संरक्षण करण्याकरीता त्यास चळवळ करावी लागली.

उद्देश

1. कामगार चळवळीचा अभ्यास करण्यामागील सर्वात महत्वाचा उद्देश्य म्हणजे तिच्या स्थापनेपासूनच्या ते आजपर्यंतचा इतिहास जाणून घेणे व तिच्यामध्ये काळाप्रमाणे कोणेकोणते बदल घडुन आले ते अभ्यासणे.
2. कामगार चळवळीच्या उदयामागे कोणकोणत्या व्यक्तीचा, संस्थाचा किंवा संघटनांचा कशा प्रकारे वाटा होता ते अभ्यासणे.
3. कामगार चळवळीतून जनतेला कोणकोणते हक्क मिळाले त्याचप्रमाणे त्यांनी त्यातून काय साध्य केले याचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.
4. कामगार चळवळीची भविष्यकाळातील परिस्थिती ही भूतकाळातील परिस्थितीशी निगडित आहे किंवा नाही हे अभ्यासणे.
5. कामगारांनी आपल्या हक्कासाठी उभारलेल्या लढयातून सरकारनी कोणकोणते नवीन कायदे निर्माण केले हे अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

संशोधन पद्धतीमध्ये विविध ऐतिहासिक साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये विविध शोधनिबंधाचा आधार घेण्यात आला आहे. प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. त्यामध्ये विविध वृत्तपत्रांचा आधार घेण्यात आला आहे. विश्लेषणात्मक पद्धतीचा आढावा घेण्यात आला.

**कामगार चळवळीचा उदय आणि विकास**

महाराष्ट्रातील कामगार चळवळीच्या उदयाचा इतिहास जुना आहे. ब्रिटीश सत्तेची पार्श्वभूमी त्यास असलेली दिसून येते. ब्रिटीशांनी भारतात उदयोगधंदयाची स्थापना करण्यास सुरुवात केली. यात भारतीय कामगारांचा समावेश होतो. ब्रिटिशांकडुन कामगारांची मोठया प्रमाणात दडपणूक केली जात असत. कामगारांना उपयुक्त ठरतील अशा प्रकारचे कायदे ब्रिटिशांनी केले नाही. त्यामुळे महाराष्ट्रात मुंबईत कामगार वर्गाचे संघटन घडून येण्यास सुरुवात झाली.

मुंबईमध्ये कामगार चळवळीची सुरुवात नारायण मेघाजी लोखंडे यांच्यामुळे झाली. 1884 साली मुंबई सरकारने कलेक्टर मूलक यांच्या अध्यक्षतेखाली एक फॅक्टरी कमिशन नेमले. महात्मा ज्योतीराव फुले यांचे सहकारी व दिनबंधु पत्राचे संपादक नारायण मेघाजी लोखंडे [1848-1897] यांनी गिरण्यांतील कामकरी लोकांच्या मंडळीचे अध्यक्ष या नात्याने साडेपाच हजार कामगारांच्या सहयानिशी मागण्यांचा अर्ज आयोगाला सादर केला. त्यामध्ये दर रविवारी सुट्टी असावी रोज अर्धा तास सुट्टी दयावी, सकाळी साडेसहापासून सूर्यास्तापर्यंतच काम करुन घ्यावे, पंधरा तारखेच्या आत पगार मिळावा आणि त्याचा हातपाय तुटला तर त्याच्या निर्वाहाची तजवीज व्हावी अशा पाच मागण्या नारायण लोखंडेनी केल्या होत्या. 23 व 26 सप्टेंबर 1884 रोजी परळ व भायखळा येथे झालेल्या सभांमध्ये कामगारांचे मत आजमावून या मागण्या करण्यात आल्या होत्या. नारायण लोखंडयानी प्रथम मुंबईत गिरणी कामगारांची चळवळ सुरु केली म्हणून ते महाराष्ट्रातील कामगार चळवळीचे जनक ठरतात. लोखंडयानी काही काळ मांडवी मिल मध्ये स्टोअरकीपरची नोकरी केलेली असल्याने गिरणा कामगारांची दु स्थिती त्यांना माहित होती. रघू भिकाजी, गेनू बाबाजी, नारायण सुर्कोजी वगैरे गिरण्यातील जॉबर मंडळीच्या तसेच विठ्ठलराव करिगावकर, कृष्णाजी अर्जून केळुसकर, रामचंद्रराव शिंदे, नारायणराव पवार वगैरे मुंबई सत्यशोधक समाजाच्या सदस्यांच्या साहाय्याने लोखंडे कामगारांची संघटना बांधीत होते.

मुंबईतील गिरणी कामगारांना कोलकात्यातील गिरणी कामगारांप्रमाणे दर रविवारी सुट्टी असावी, तसेच तेथील गिरण्यात दवाखान्यांची व डॉक्टरांची सोय आहे तशी मुंबईत असावी असे लोखंडयांचे म्हणणे होते. या आयोगाने केलेल्या शिफारशीच्या आधारे

1981 चा कारखान्यांबाबतच्या कायदा मंजूर करण्यात आला. या कायदयान्वये रविवारी मिळू लागली. नऊ वर्षांखालील मुलांना गिरण्यात काम देण्यास मनाई करण्यात आली. नऊ ते ते चौदा वर्षे वयाच्या मुलांना नऊ तासांऐवजी सात तास काम देण्यात येऊ लागले. स्त्रियांना दर दिवशी अकरा तास काम करावे आणि त्यांना रात्रपाळीस बोलावू नये अशीही तरतुदी करण्यात आली. रविवार हा ख्रिस्ती लोकांचा विश्रांतीचा दिवस म्हणून त्या दिवशी सुट्टी मिळावी असा लोखंडयाचा युक्तिवाद होता.

1890 साली गिरण्यात कापडाचे शिलकी साठे वाढल्याचे कारण देऊन दरमहा आठ दिवस मुंबईच्या गिरण्या बंद ठेवण्याचा घाट घातला गेला. तेव्हा लोखंडयाच्या अध्यक्षतेखाली दहा हजार कामगारांची सभा महालक्ष्मीचा घोडयांच्या शर्यतीच्या मैदानावर घेतली. या सभेत स्त्री कामगारांची भाषणे केली. मुंबईतील कामगार चळवळीच्या या आरंभीच्या काळात सभा भरवून व मुख्यत अर्जविनंत्यांच्या मार्गाने कामगारांचे प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जात होता. या चळवळीचे नेते सत्यशोधक विचारसरणीचे होते आणि सत्यशोधकांचा सर्वच क्षेत्रातील मध्यस्तांना विरोध होता. देव व भक्त यांच्यामध्ये आडवा येणारा भट किंवा पुरोहित, इंग्लडची राणी व हिदुस्थानातील रयत यांच्यामध्ये आडवी येणारी गो-यांची व काळयांची नोकरशाही शेतकरी व ग्राहक यांच्यामध्ये आडवा येणारा आणि दोघांनाही लूबाडणारा व्यापारी तसेच राजकीय व आर्थिक क्षेत्रातील मध्यस्तांवर सत्यशोधक हल्ल चढवीत असत. नारायण लोखंडेही इतर सत्यशोधकांप्रमाणे राजनिष्ठ होते. त्यामुळे राज्यकत्यांचे मन वळवून कामगारांची दु स्थिती दूर करण्यावर त्यांचा भर होता.

1892 साली अनेक संप झाले आणि त्यांचे स्वरुपही गंभीर होते. लोखंडयांनी पत्र लिहील्यामुळे 1893 च्या सुरुवातीस सर्व मिलमधले कामगार संपावर गेले होते. लोखंडयांनी संप करण्यासाठी अहिंसेच्या मार्गाचा स्वीकार करावा असे जनतेला आव्हान केले. जे काही करायचे ते कायदेशीररितीने करा, हिंसा करु नका असे सांगितले. त्यामुळे लोखंडयांच्या काळातील कामगार चळवळ सनदशीर मार्गानी चालवली जात होती. हिंसेपासून ती दूर होती. तिच्या मागण्या फक्त आर्थिक स्वरुपाच्या होत्या. परंतू 1897 साली नारायण लोखंडेच्या मृत्यूने मुंबईची कामगार चळवळ पोरकी झाली.

मुंबईतील गिरण मालकांनी सरकारी मॅचेस्टरमधील गिरणीमालकांच्या दबावखाली येऊन फॅक्टरी ॲक्ट सुरु करतील हे जाणून 1876 मध्ये Bombay Mill Owners Association हि संघटना स्थापना केली. त्यांना कामगार हितापेक्षा स्वहिंत महत्वाचे वाटत होते. ही संघटना स्वार्थासाठी संघटीत झालेली होती. कामगारांच्या दु खाला वाचा फोडणारी नव्हती.

**महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा विकास**

राष्ट्रीय महासभेमध्ये 1923 साली कामगार संघटना स्थापना झाली. या काळात राष्ट्रीय सभेत प्रामुख्याने श्रीमंत वर्गाचे वर्चस्व होते त्यामुळे त्यांनी कामगार वर्गाला व चळवळीला महत्व दिले नाही.

1. ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस [आयटेक]

ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेसची स्थापना 31 ऑक्टोबर 1920 साली करण्यात आली. या संघटनेवर साम्यवादयांचे वर्चस्व होते.

2. इंडियन नॅशनल ट्रेड युनियन कॉंग्रेस [इंटेक]

[भारतीय राष्ट्रीय कामगार संघ सभा]

कामगारांवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी कॉंग्रेसने 3 मे 1947 रोजी ही संघटना स्थापना केली. ही संघटना कॉंग्रेसशी निगडीत होती. त्याचप्रमाणे ही संघटना कामगारांच्या मागण्या शांततेच्या आणि लोकशाही मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न करणार होती.

3. कापड गिरणी कामगारांची चळवळ

महाराष्ट्रातील कामगार चळवळीची सुरुवात मुंबईतून झालेली दिसते. कारण कापड गिरण्यांची सुरुवातच मुंबईतून झालेली दिसते. आयटेक आणि इंटेक या संघटनेमार्फत गिरणी कामगारांचे हितसंबंध जोपासण्यात आले.

संदर्भ

1. बा.रं.रायरीकर - लेखक, मराठी विश्वकोश
2. विसाव्या शतकातील महाराष्ट्र - खंड पहिला- 1901-1914
3. विसाव्या शतकातील महाराष्ट्र राजकीय इतिहास खंड तिसरा
4. आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास [1921-1929] डॉ. जयसिंगराव पवार , सौ. वसुधा पवार
5. 20 व्या शतकातील महाराष्ट्राचा इतिहास- डॉ. मोरे, डॉ.नवथर, डॉ.काळभोर